||श्री राम समर्थ|| ||श्री नागनाथ प्रसन्न||
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६), पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रँड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २३२ वा | गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# महिला आरक्षण भाजपचे 'मायाजाल'

## आरक्षणाच्या नावाखाली 'राजकीय सर्जिकल स्ट्राइक'?



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** केंद्रातील भाजप सरकार महिला सक्षमीकरणाचा मुखवटा घालून दक्षिण भारताच्या राजकीय अस्मितेला धक्का देण्याचा 'भीषण कट' रचत आहे, असा आरोप उपमुख्यमंत्री व काँग्रेस प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी केला आहे. प्रसिद्धीपत्रकात त्यांनी म्हटले आहे की, केंद्र सरकार प्रस्तावित करत असलेले महिला आरक्षण विधेयक हे केवळ 'मायाजाल' असून, दक्षिणेकडील राज्यांचे हक्क हिरावून घेण्यासाठी रचलेला 'राजकीय सर्जिकल स्ट्राइक' आहे.

महिलांना सत्तेत योग्य प्रतिनिधित्व मिळावे, हा काँग्रेसचा ठाम दृष्टिकोन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला आरक्षण लागू केले होते. तेव्हा विरोध करणारेच आता महिला आरक्षणाचा पुरस्कार करत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

मात्र, महिला आरक्षणाची अंमलबजावणी 'मतदारसंघ पुनर्रचने'शी जोडणे, हे तर्कहीन असल्याचे त्यांनी नमूद केले. या अटीमुळे तत्काळ न्याय मिळण्याऐवजी आरक्षण लांबणीवर पडेल आणि पुनर्रचना भाजपच्या राजकीय फायद्यासाठी वापरली जाईल, असा आरोप त्यांनी केला. शिवकुमार यांनी पुढे म्हटले की, पुनर्रचनेमुळे दक्षिणेकडील राज्यांवर अन्याय होत आहे. कर्नाटक, तमिळनाडू आणि केरळ या राज्यांनी राष्ट्रीय हित लक्षात घेऊन लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले आहे. मात्र, आता जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांना अधिक लोकसभा जागा देऊन दक्षिणेकडील प्रगत राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**भाजपला थेट प्रश्न**

महिला आरक्षण लागू करण्यासाठी मतदारसंघ पुनर्रचना अनिवार्य का आहे? विद्यमान ५४३ लोकसभा मतदारसंघांमध्येच आरक्षण लागू करण्यास अडथळा काय आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, दक्षिणेकडील राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये कपात होणार नाही, याची कायदेशीर हमी केंद्र सरकार देणार का, असा प्रश्नही त्यांनी विचारला.

**भाजपचा गुप्त अजेंडा**

उत्तर भारतातील हिंदी पट्ट्यातील राज्यांमध्ये जागा वाढवून दक्षिणेचा आवाज कमी करण्याचा भाजपचा गुप्त अजेंडा असल्याचा आरोप केला. संसदेत दक्षिणेचे प्रतिनिधित्व कमी झाल्यास कर वाटपातही अन्याय होईल, असे त्यांनी म्हटले.

**दक्षिण भारताच्या अस्मितेला धक्का**

दरम्यान केंद्रातील भाजप सरकार महिलांच्या सक्षमीकरणाचा आव आणत दक्षिण भारताच्या राजकीय अस्मितेला धक्का देण्याचा 'भारी डाव' आखत असल्याचा आरोपही शिवकुमार यांनी केला आहे. महिला आरक्षण विधेयकाच्या अंमलबजावणीभोवती केंद्राने ठेवलेल्या अटींवर त्यांनी जोरदार टीका केली. शिवकुमार म्हणाले, "प्रस्तावित महिला आरक्षण केवळ दिखावा असून त्यामागे राजकीय हेतू दडलेला आहे. आरक्षण लागू करण्यासाठी 'मतदारसंघ पुनर्रचना' (डिलिमिटेशन) अनिवार्य ठरविण्याचा निर्णय तर्कसंगत नसून, तो आरक्षण लांबणीवर टाकण्याचा प्रयत्न आहे. या प्रक्रियेचा वापर सत्ताधारी पक्ष आपल्या फायद्यासाठी करणार आहे."

दक्षिणेकडील राज्यांनी लोकसंख्या नियंत्रणात यश मिळवले असतानाही, भविष्यात लोकसंख्या जास्त असलेल्या राज्यांना अधिक लोकसभा जागा देण्याचा विचार अन्यायकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे कर्नाटक, तामिळनाडू, केरळसारख्या प्रगत राज्यांचे संसदीय प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. "हा केवळ राजकीय प्रश्न नसून दक्षिण भारताच्या स्वाभिमानाचा मुद्दा आहे," असे ते म्हणाले.

डी. के. शिवकुमार : रायबरेलीत राहुल गांधींच्या विजयाची कमान सांभाळणारे डी. के. शिवकुमार; वाढदिवसही साजरा केला नाही– डी. के. शिवकुमार, प्रदेशाध्यक्ष, काँग्रेसमहिला आरक्षणाला काँग्रेसचा पाठिंबा आहे; मात्र त्या नावाखाली प्रादेशिक असमतोल निर्माण करण्यास तीव्र विरोध आहे. महिलांचे हक्क अबाधित राहिले पाहिजेत; पण त्यासाठी देशाच्या संघीय रचनेला धक्का बसता कामा नये. केंद्राने पुनर्रचनेची अट तातडीने मागे घ्यावी; अन्यथा दक्षिणेकडील जनता योग्य उत्तर देईल.

## गेट आऊट ऑफ हिअर. म्हणत संतप्त महिलेने मंत्री महाजन यांना सुनावले

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महिला आरक्षणाआडून सोयीची मतदारसंघ पुनर्रचना करण्याचा डाव उधळला गेल्यानंतर भाजपने आता मोर्चे काढण्यास सुरुवात केली आहे. मुंबईत सोमवारी काढण्यात आलेल्या मोर्चामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली.

वाहतूककोंडीमुळे संतप्त झालेल्या एका महिलेने गेट आऊट ऑफ हिअर... असे म्हणत मंत्री गिरीश महाजन यांना खडेबोल सुनावत आक्रोश व्यक्त केला.

महिला आरक्षण विधेयकाच्या समर्थनार्थ भाजपने मंगळवारी मुंबईत जनआक्रोश मोर्चा काढला. वरळी जांबोरी मैदान ते वरळी डोमदरम्यान या मोचार्मुळे प्रचंड



वाहतूककोंडी झाली. लोकांना मनःस्ताप सहन करावा लागला.

**देशातील महिला अशाच भाजपला सत्तेतून हाकलतील – सपकाळ**

आज फक्त मंत्री गिरीष महाजन यांना पळवून लावले आहे. येणाऱ्या काळात देशातील महिला अशाच प्रकारे भाजपला सत्तेतून हाकलून लावल्याशिवाय राहणार नाहीत. 'भाजप भगाओ, देश बचाओ!' असे ट्विट काँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे. महिलांच्या सशक्तीकरणाच्या नावाखाली राजकारण करणाऱ्या, आरक्षणाचा मुद्दा पुढे करून महिलांची दिशाभूल करणाऱ्या आणि त्यांना केवळ राजकीय साधन म्हणून वापरत खोटे नॅरेटिव्ह पसरवणाऱ्या भाजपचा खरा चेहरा या भगिनीने वरळीहून निघालेल्या मोर्चासमोर जाऊन उघडा पाडला आहे, असे सपकाळ म्हणाले.

संतप्त झालेल्या या महिलेने थेट मंत्री गिरीश महाजन यांना जाब विचारला. तुम्हाला काय करायचं ते मैदानामध्ये जाऊन करा, मी एका तासापासून इथे उभी आहे. ट्राफिक कशाला रोखता? रस्ता मोकळा करा, गेट आऊट ऑफ हिअर... असे ती म्हणाली.

## महाराष्ट्रातील 30 हजार शिक्षकांच्या नोकऱ्या धोक्यात?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** एक शिक्षक लाखो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवतो. पण आता शिक्षकांच्या करिअरवरच संक्रांतीची वेळ महाराष्ट्रात येण्याची भीती निर्माण झाली. सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांची कमी पटसंख्या हे यामागचं कारण ठरलंय.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर सध्या एक विचित्र विरोधाभास निर्माण झाला आहे. एकीकडे आपण शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे हजारो शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या इतकी रोडावली आहे की, तिथले शिक्षक आता 'अतिरिक्त' ठरू लागले आहेत. राज्य सरकारने नुकत्याच केलेल्या संचमान्यतेतून ही धक्कादायक आकडेवारी समोर आली असून, यामुळे राज्यातील शिक्षण वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. काय घडलंय नेमकं? सविस्तर समजून घेऊया.

**'संचमान्यता' आणि अतिरिक्त शिक्षकांचे वास्तव**

दरवर्षी शिक्षण विभाग शाळांमधील विद्यार्थी संख्येनुसार शिक्षकांची पदे निश्चित करतो, ज्याला 'संचमान्यता' म्हटले जाते. 2025-26 च्या ताज्या आकडेवारीनुसार, राज्यातील जवळपास 4 हजारहून अधिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या 10 पेक्षाही कमी झाली आहे. आरटीई (RTE) नियमांनुसार, जिथे विद्यार्थी नाहीत तिथे शिक्षक ठेवणे सरकारला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. परिणामी, हजारो शिक्षक आता आपल्या नोकरीच्या आणि बदल्यांच्या चिंतेत आहेत.

**ग्रामीण भागातील शाळांची बिकट अवस्था**

हे संकट सर्वाधिक ग्रामीण आणि दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळांना बसले आहे. पालकांचा ओढा खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढल्याने सरकारी शाळांमधील पटसंख्या झपाट्याने घटली आहे. काही गावांमध्ये तर अशी स्थिती आहे की, संपूर्ण शाळेत केवळ 5 ते 7 विद्यार्थी उरले आहेत. अशा शाळांना 'कमी पटसंख्येच्या शाळा' म्हणून घोषित करून त्या जवळच्या मोठ्या शाळांमध्ये विलीन करण्याची हालचाल प्रशासन करत आहे.

**शिक्षकांच्या समायोजनाचे मोठे आव्हान**

जे शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत, त्यांना कामावरून काढले जात नाही, परंतु त्यांचे 'समायोजन' करणे हे सरकारसमोरचे मोठे आव्हान आहे. या शिक्षकांना त्यांच्या मूळ शाळेतून हलवून जिथे शिक्षकांची कमतरता आहे अशा शाळांमध्ये पाठवले जाते. मात्र, हे करताना सेवाज्येष्ठता, घरापासूनचे अंतर आणि रिक्त जागांची उपलब्धता यावरून शिक्षक संघटना आणि प्रशासन यांच्यात मोठा संघर्ष पाहायला मिळतोय.

**गुणवत्तेवर होणारा परिणाम**

जेव्हा एखादा शिक्षक 'अतिरिक्त' ठरतो आणि त्याची बदली दुसऱ्या शाळेत केली जाते, तेव्हा त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर होतो. नवीन वातावरणाशी जुळवून घेणे आणि जुन्या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, ही दुहेरी समस्या उभी राहते. अनेकदा, शिक्षक अतिरिक्त होऊ नये म्हणून बोगस पटसंख्या दाखवण्याचे प्रकारही घडतात, ज्यावर आता सरकारने कडक नजर ठेवली आहे.

**खासगी अनुदानित शाळांमधील 'पद' संकट**

केवळ सरकारीच नाही, तर खासगी अनुदानित शाळांमध्येही हे संकट गडद आहे. अनेक संस्थाचालकांनी शिक्षक भरती केली आहे, पण आता विद्यार्थी नसल्यामुळे त्या शिक्षकांचे पगार सरकारी तिजोरीतून करणे सरकारला कठीण जात आहे. यामुळे नवीन शिक्षक भरतीवरही अघोषित बंदी आल्यासारखी स्थिती निर्माण झाली असून, शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण झालेल्या तरुणांमध्ये निराशेचे वातावरण आहे.

**शहरी स्थलांतर आणि शैक्षणिक असमतोल**

लोक रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरित होत असल्यामुळे गावातील शाळा ओस पडत आहेत. मुंबई, पुणे, नागपूर सारख्या शहरांमधील मनपा शाळांची अवस्थाही फार वेगळी नाही. वस्त्या बदलल्या की तिथल्या शाळांमधील पटसंख्या कमी होते आणि शिक्षक अतिरिक्त ठरतात. हा एक सामाजिक बदल असला तरी, शिक्षणाच्या पायाभूत सुविधांवर त्याचा होणारा परिणाम दीर्घकालीन आहे.

## धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत 101.77 टीएमसी अधिकचा पाणीसाठा

### एल-निनोचा प्रभाव लक्षात घेऊन पाणी जपून वापरा - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली.

गतवर्षीच्या तुलनेत यंदा १०१.७७ टीएमसी पाणीसाठा अधिकचा आहे. गतवर्षी हा साठा ५५१.८६ टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पाऊसाच्या अनियमततेमुळे पुढील वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा आणि एल-निनो प्रभावामुळे संभाव्य परिणामांची माहिती दिली.

एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२



टक्के तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती. १५ ऑक्टोबर २०१४ रोजी ८७२ टीएमसी तर याच दिवशी २०१५ ला ६२५ टीएमसी पाणीसाठा होता. त्या तुलनेत २०२५ मध्ये १५ ऑक्टोबरला १३३०.९७ टीएमसी पाणीसाठा होता. हा पाणीसाठा २१ एप्रिल २०२६ रोजी ६५३.६३ टीएमसी आहे. गतवर्षीच्या गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०१.७७ टीएससी पाणीसाठा अधिकचा आहे. यावर राज्यातील पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून ऑगस्ट २०२६ अखेर पिण्यासाठी पाणी उपलब्ध राहण्याच्या दृष्टीने काटकसरीच्या उपायोजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्यासोबतच एल-निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पाऊस कमी होण्याची शक्यता असल्याने पुढील वर्षी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीने आतापासून पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी केले.

महसूल विभागनिहाय पाणीसाठा (कंसात धरण संख्या) यंदाचा उपयुक्त पाणीसाठा, गतवर्षीचा पाणीसाठा (टीएमसीमध्ये)

- नागपूर – (३८७) ८०.७९, ६३.४०,
- अमरावती – (२७६) ७३.७२, ६५.१३.
- छत्रपती संभाजीनगर – (९२९) १२९.३७, ९७.०९.
- नाशिक – (५३९) १०१.९६, ८९.२८.
- पुणे – (७२४) २०६.५५, १७४.०४.
- कोकण – (१७३) ६१.२४, ६२.९२.
- एकूण – (३०२८) ६५३.६३, ५५१.८६.

राज्यातील प्रमुख धरणांतील पाणीसाठा : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा, गतवर्षीचा पाणीसाठा (टिएमसीमध्ये) या क्रमाने –

कोयना : ३३.६२, ३६.७६ . जायकवाडी : ४२.०३, ३४.४४. उजनी : १३.३९, (०) पेंच प्रकल्प समूह : २६.५७, २६.३५. इसापूर : २१.४५, १७.८२. भातसा : १५.७०, १४.९१. गोसीखुर्द : १४.३१, ५.९३. खडकवासला धरण समूह : ११.३२, ९.८२. मुळा : ९.५४, १०.५३. अप्पर वर्धा : १०.२१, ९.५३. अप्पर वैतरणा : ६.५२, ५.९५, भंडारदरा : ५.२५, ६.०४ टिएमसी.

## ओळखपत्र मागितल्याने उत्पादन शुल्क अधिकाऱ्याचे धाबेवाल्याला मारहाण

**माढा (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक येथे धक्कादायक प्रकार घडला आहे. उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी आणि एका धाबेवाल्यामध्ये झालेल्या वादातून थेट हाणामारी झाली.

या घटनेत दोन्ही बाजूंचे लोक जखमी झाले असून परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. नंतर गैरसमजुतीतून ही मारामारी झाल्याची माहिती समोर आली.

मिळालेल्या माहितीनुसार, उत्पादन शुल्क विभागाचे कर्मचारी मुंबई पासिंगची इनोव्हा गाडी घेऊन परिसरात फिरत होते. त्यांनी एका हॉटेल चालकाकडे चौकशी करण्याचा प्रयत्न केला. मात्र संबंधित धाबेवाल्याने त्यांना ओळखपत्र विचारल्याने वादाची ठिणगी पडली आणि प्रकरण हातघाईवर आलं.

**ओळखपत्रावरून वाद, मारहाणीपर्यंत प्रकरण**

धाबेवाल्याने अधिकाऱ्यांना ओळखपत्र दाखवण्याची मागणी




केली. मात्र यावरून दोघांमध्ये बाचाबाची सुरू झाली. त्यानंतर उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी धाबेवाल्याला मारहाण केल्याचा आरोप आहे.

**ग्रामस्थांचा संताप, अधिकाऱ्यांनाही चोप**

या प्रकारानंतर घटनास्थळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने जमा झाले. उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांनी धाबेवाल्याला मारहाण केल्याचं पाहिल्यानंतर ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलाच चोप दिला. त्यामुळे परिस्थिती आणखी चिघळली आणि दोन्ही बाजूंमध्ये जोरदार हाणामारी झाली.

**दोन्ही बाजूंचे जखमी रुग्णालयात**

या घटनेत धाबेवाल्यासह उत्पादन शुल्क विभागाचे काही कर्मचारी जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने माढा येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**पोलिसांकडून तपास सुरू**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून नेमका प्रकार कसा घडला याची चौकशी केली जात आहे.

## पावसाच्या नुकसानीपोटी ५.४० कोटींचा निधी मंजूर

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्ह्यात मार्च महिन्यात झालेल्या पूर्वमोसमी पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले होते, या नुकसानीची भरपाई मिळण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ७ एप्रिल रोजी शासनाकडे प्रस्ताव सादर केला होता.

प्रशासनाच्या तत्पर पाठपुराव्यामुळे अवघ्या आठवड्यात शासनाने ५ कोटी ४० लाख रुपयांची मदत मंजूर केली असून, यामुळे जिल्ह्यातील ४ हजार ७१ बाधित शेतकऱ्यांना मोठा



दिलासा मिळाला आहे.

या मदतीमुळे २ हजार ७७७ हेक्टरवरील बाधित पिकांना आधार मिळणार आहे, यातील सर्वाधिक फटका मोहोळ तालुक्यातील शेतकऱ्यांना बसला आहे. मोहोळमधील सर्वाधिक २ हजार ५२७ शेतकऱ्यांसाठी ३ कोटी २८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

त्याशिवाय सांगोला तालुक्यातील ४८९, माळशिरस तालुक्यातील ३७५, उत्तर सोलापुरातील २६५, मंगळवेढा तालुक्यातील १८६, अक्कलकोट तालुक्यातील १८३, माढ्यातील ३९ आणि पंढरपूर तालुक्यातील ७ शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे.

निधी मंजूर झाल्यामुळे आता पुढील कार्यवाही केली जात असून, लवकरच ही रक्कम बाधितांच्या खात्यावर जमा केली जाणार आहे.

**नुकसानीचे क्षेत्र आणि कंसात लाभार्थी शेतकरी संख्या**

- जिरायती पिके: १७८ हेक्टर (३३० शेतकरी)
- बागायती पिके: १,०७६ हेक्टर (१,४८६ शेतकरी)
- फळबागा: १,५२१ हेक्टर (२,२५५ शेतकरी)

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम 8275274353
डी.बी.शिंदे 9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरुम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

### वात्रटिका

**ती जेव्हा भडकते**

नेत्यांची अटकळ आणि
वळवळ लोक ओळखू लागले...
भिड भाड न ठेवता समोर
तोंडावर झाप झाप झापू लागले...
तिच्यासाठी त्यांनी मुंबईत
काढला विशाल असा मोर्चा...
वाहतूक कोंडी बघून रौद्ररुप
घेतले तिने त्याचीच फक्त चर्चा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# भरकटलेली माणसे

अमेरिकेतील एपस्टिनचे प्रकरण बरेच गाजले. अनेक नामदार आणि मालदार मंडळींची नावे समोर आली. काहींचे फोटोही आले. आंबट-गोड सर्व प्रकारच्या चर्चा झाल्या. अचानक इराणच्या विरोधात युद्ध सुरू झाले. एपस्टिनचे जनक असलेले इस्रायल आणि त्याचे अनेक भक्त असल्यामुळे सर्वाधिक झळ पोहोचण्याची शक्यता असलेली अमेरिका यांनी युद्ध सुरू केले.

एपस्टिनकडून लक्ष अन्यत्र वळवण्यासाठी त्यांनी खामेनी यांच्याकडे मोर्चा वळवला, अन्यथा एवढ्या तातडीने इराणवर हल्ला करावा असे काही घडले नव्हते. एपस्टिनने अगोदरच जगाचा निरोप घेतला आहे. त्याच्या चर्चांनीही आता जगाचा निरोप घेतला आहे.

या चर्चांच्या केंद्रस्थानी असर्णाया अनेक धनिकांनी आणि बलाढ्यांनी मोकळा श्वास घेतला असेल. तिकडे जगातली खळबळ थंड झाली असताना महाराष्ट्रात कोण्या खरात बाबाची अचानक चर्चा सुरू झाली. खरात बाबाचे अनेक उपद्व्याप समोर आले असले आणि अजूनही पाइपलाइनमध्ये बर्याच गोष्टी असल्याचे सांगितले जात असले तरी बळी म्हणून महाराष्ट्रातील केवळ एका वलयांकित राजकारणी महिलेची खुर्ची तेवढी गेली. इतर लोकांना अद्याप काही हात लागला नाही. कोणी कोणी खरात बाबाला किती वेळा कॉल केले याची एक आकडेवारीच महाराष्ट्रातील एका कायम चर्चेत असलेल्या वलयांकित कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी सादर केली.

कोणत्याही पक्षाची टोपी डोक्यावर नसताना आणि शाल अंगावर नसताना अंजलीताईंना खडान्खडा माहिती कशी मिळते हाच एक मोठा चमत्कार आहे. तथापि, आपण बाबा लोकांवर चर्चा करताना चमत्काराची भाषा बोलायला लागलो तर बाबा लोकांपुढे माना डोलावणारे भक्त आणि आपल्यात फरक तो काय राहणार? अंजली दमानियांनी नवा गौप्यस्फोट केला आहे.

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाचे कनेक्शन थेट मंत्रालयापर्यंत पोहोचले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. राज्य सरकार आणि केंद्र सरकार लोकांना पाइपद्वारे गॅस मिळेल यासाठी तातडीने कनेक्शन देण्याचे निर्देश देत असताना ते जमत नाही. मात्र भोंदू बाबांचे कनेक्शन मंत्रालयापर्यंत पोहोचतात हेच प्रगतीशील महाराष्ट्राने एवढ्या वर्षात कमावले हे मानून धन्य व्हावे लागते.

खरातचे धागेदोरे मंत्रालयातील वरिष्ठ अधिर्कायापर्यंत गेले आहेत असा दावा दमानिया यांनी केला. त्यांनी कोणाची नावे घेतली या तपशीलात जाण्याची गरज नाही. ती नावे खरीही असू शकतात किंवा खोटीही. वास्तविक खरी असण्याचीच शक्यता जास्त आहे, त्याचे कारण आताच्या आणि अगोदरच्या सरकारमधील अनेक नामांकित मंडळींनी खरातला फोन अ फ्रेंड या धरतीवर असंख्य वेळा फोन केले आहेत.

त्यात कोण पहिल्या स्थानावर आहे आणि कोण पुढच्या स्थानांवर आहेत हेही एव्हाना अंजली दमानियांनी सांगितलेल्या संख्येवरून सगळ्यांना समजले आहे. खरातसोबतचे फोटो मात्र मोजक्याच मंडळींचे समोर आले आहेत. त्यातही विकेट फक्त एकाच महिलेची पडली आहे. इतर मंडळींना गॉडफादर असावा किंवा ते स्वतःच गॉडफादर असावेत म्हणून त्यांचे प्रताप बाहेर आले नाहीत किंवा खूप अगोदरच जेव्हा या प्रकरणाची कुणकुण लागली होती तेव्हाच सगळी साफसफाई झाली होती असेही म्हणतात.

महाराष्ट्र सरकारला अमेरिका आणि इस्रायलप्रमाणे कोणत्या देशावर हल्ला करता येत नाही. त्यामुळे अनुल्लेखानेच हे प्रकरण मारण्याचा प्रयत्न दिसतो. चर्चा अशीही आहे की कोणाला तरी जागेवर स्थिर ठेवण्यासाठी खूप पूर्वीपासून माहीत असलेले खरात बाबा प्रकरण सर्वसामान्यांनाही माहीत व्हावे याकरता आता प्रदर्शित केले गेले.

हिशेब चुकता करण्यासाठी किंवा शह देण्यासाठी. मंत्री पाच वर्षांसाठी असतात. त्यांची पात्रता असेल तर लोक त्यांना पुन्हा निवडतात. मात्र, र्खया अथार्ने राज्य चालवणारी अधिकारी मंडळीही तेथे नमस्काराला जात असतील तर पूर्वी निवडणुकीत म्हटले होते ना 'अरे कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र' हा प्रश्न आता विचारात घ्यावा लागणार आहे.

भारतात बाबा लोकांचा दुष्काळ कधीच नव्हता आणि भविष्यातही नसेल एवढे आपल्याकडचे लोक भोळे आहेत. लाखोंच्या घरात अनुयायी आणि अब्जावधींच्या घरात मालमत्ता असलेले काही व्हीआयपी बाबा बलात्काराच्या घृणास्पद गुन्ह्यांत तुरुंगात आहेत तरीही त्यांच्यावरची भक्तांची निष्ठा ढळलेली नाही. एक बाबा हल्ली त्यांना सातत्याने मिळर्णाया पॅरोलमुळेच चर्चेत असतात.

कदाचित तुरुंगातील जागाही पवित्र करण्यासाठी व तेथील कैद्यांनाही आपल्या सहवासाची दिव्यानुभूती व्हावी यासाठी हे बाबा तुरुंगात जात असावेत. एरव्ही सर्व प्रकारच्या राजांची कृपा त्यांच्यावर होते. काही व्हीव्हीआयपी महाराजही आहेत. काही बाबा उद्योगपती झाले आहेत. हजारो कोटींची उलाढाल आहे. या व्हीव्हीआयपींबद्दलही कुजबूज आणि न्यायालयांची दारे ठोठावली जात आहेत.

त्यांचे कोणते बिंग अजून फुटले नसल्यामुळे कायदाही काही करू शकत नाही. या सगळ्यांची संपत्ती डोळे दीपवणारी आहे. लाखो अनुयायांचे तारणहार असल्याचे भासवर्णाया व्यक्तीच्या विरोधात कोणी बोलू शकत नाही. कायदाही समोर काही येत नाही तोपर्यंत हातावर हात धरूनच बसलेला असतो.

ज्यांनी डोळे उघडे ठेवून सगळीकडे लक्ष ठेवायचे असते ते अंमलबजावणी करणारे अधिकारीही भक्तांत सामील होऊ लागले तर भविष्यात अवघडच परिस्थिती निर्माण होईल. श्रद्धा असावी, त्याला कोणी आडवे जाण्याचे कारण नाही. तथापि, अंधश्रद्धा आली की विषय संपतो. चांगले चांगले भरकटतात. सगळीकडे भरकटलेली माणसेच दिसू लागतात. मंत्र्यांचे दुःख नाही, अधिकाऱ्यांनी एवढे शिक्षण घेतल्यावरही हेच करावे?

# सावधान! 'पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालिक नहीं'

पृथ्वीचा दीवसेंदीवस ह्रास होत आहे आणि हवामानात आमुलाग्र बदल होत असून ऑक्सिजनची मात्रा सुध्दा दिवसेंदिवस कमी होत आहे ही घटना करोना महामारीच्या रूपाने आपण उघडल्या डोळ्यांनी पहाली. यामुळे जगात लाखोच्या संख्येने जिवीत हानी सुध्दा झाली. याकरीता पृथ्वीला वाचवाण्यासाठी सर्वांनी "संकल्प"करण्याची गरज आहे. आज बदलत्या हवामानामुळे दिनांक १९ एप्रिल २०२६ ला जगात विदभार्ची सर्वात हॉट शहरांमध्ये नोंद करण्यात आली. कारण विदभार्तील अकोला व वर्धा जिल्ह्याचे तापमान ४५ अंश सेल्सिअसवर पोहोचले व इतर शहरांमध्ये ४४ अंश सेल्सिअस पार केले असून संपूर्ण विदर्भ होरपळून निघाला आहे. जगात पृथ्वी सुरक्षित रहावी या उद्देशाने १९७० पासून "जागतिक पृथ्वी दीवस"साजरा करण्यात येतो. प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण व पृथ्वीला निर्माण होणारा धोका यावर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम राबविण्यात आले व अनेक देशांनी प्लास्टीक पासुन होणारे प्रदुषण टाळण्याचा प्रयत्न केला व अनेक देश प्लास्टीकच्या प्रदुषणापासुन मुक्त झाले. भारतानेही पृथ्वी संरक्षणासाठी व प्रदुषण दुर करण्यासाठी प्लास्टीकवर बंदी घातली आहे. सध्याच्या परीस्थितीत जगातील वाढती लोकसंख्या पृथ्वीतलावरील मोठे संकट आहे. यामुळे हवेतील ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसुन येते. कारण जगातील वाढत्या लोकसंख्येमुळे जंगलसंपदा छीन्न-विछीन्न झाल्याचे दीसुन येते व यामुळे हवामान अक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे. त्याचप्रमाणे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोठ्या प्रमाणात कारखाने दीसुन येतात. यामुळे संपूर्ण जगात स्थलप्रदुषण, वायुप्रदूषण व जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात होतांना दिसते. कारखान्यांचा विस्तार जगातील सर्वच देशांनी वाढविला आहे. यामुळे पहीला प्रहार जंगलसंपत्तीवर केलेला आहे. मानवाच्या अतिरेकामुळे पृथ्वीतलावर भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी, महाप्रलय, महामारी, साथीचे रोग, अती पाउस, अती उष्णता, अती थंडी, वनवे लागने अशाप्रकारचे विनाशाकडे नेणाऱ्या घटना दीवसेंदीवस वाढतांना दीसत आहे. ह्या संपूर्ण घटना मानवाने पृथ्वीवर अत्याचार केल्यामुळे दीसुन येतात. २१ व्या शतकात मानव इतका सामोरं गेला आहे की अनेक टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून अत्याधुनिक हतियार, अनुबॉम्ब बनविण्याच्या शर्यती लागलेला आहेत. आतातर "बायोवेपन्स" म्हणजे जैविक हतीयार बनविण्याची शर्यत लागली आहे आणि याही पुढे जाऊन सध्याचे अमेरिका-इजरायल-इराण-हमास-हिजबुल्ला यांच्यातील युद्ध द्रोणच्या सहाय्याने लढले जात आहे. यामुळे पृथ्वी "तहस-नहस" होवू शकते. आज संपूर्ण जग उत्पादन वाढविण्यासाठी जैविक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत यामुळे पृथ्वीतील शक्ती व ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी होतांना दिसते. सध्याच्या परीस्थितीत चीन जैविक हतीयार बनविणारा देश बनलेला आहे. चीन असा देश बनला आहे की तो नेहमीच जैविक हतीयाराचे वेगवेगळे परीक्षण करीत असतो. २०१९ मध्ये चीनने "कोरोणा व्हायरसचे" परीक्षण करून मानवजातीसोबत "खुनी तांडव" केल्याचे दिसून आले. आज संपूर्ण जग पृथ्वीला वाचविण्यासाठी प्रयत्न करीत आहे तर चीन "पृथ्वीचा सर्वनाश" करतांना दिसतो. आज मानवाने जंगल संपत्तीची हत्या केल्यामुळे नदी-नाले, तलाव, विहिरी मोठ्या प्रमाणात आटलेले दीसतात. यामुळे दीवसेंदीवस पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे व हवामानात मोठ्या प्रमाणात बदल झाल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे ग्लोबल वॉर्मिगमुळे सुध्दा पृथ्वीचे संतुलन डगमगायला लागले आहे. पृथ्वीवरील जंगलसंपदा कमी झाल्यामुळे व छोटे-मोठे तलाव आटल्यामुळे हिंसक पशु व जंगलातील इतर पशू (वाघ, बिबट्या, अस्वल, हरीण, बंदर) यांना जंगलात योग्य आहार व पाणी मिळत नसल्यामुळे शहराकडे धाव घेतांना दीसतात हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. अशा अनेक कारणांमुळे पृथ्वीचा ह्रास होत आहे व जंगली प्राण्यांचा जिवन धोक्यात आलेले आहे. यावर उपाय शोधण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक योजना राबविल्या जातात. त्यातुनच १९७० मध्ये विंसकॉन्सिन सीनेटर गेलॉर्ड नेल्सन यांनी "२२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस" साजरा करण्याची संकल्पना साकार केली आणि तेव्हापासून २२ एप्रिल हा जागतिक पृथ्वी दिवस म्हणुन साजरा केल्या जातो. आज जगात १९६ हुन अधिक देश आहेत या देशांच्या तुलनेत लोकसंख्येचा विचार केला तर १००० कोटींच्यावर लोकसंख्या आहे. त्यामुळे संपूर्ण देशांनी पृथ्वीला वाचविण्याच्या उद्देशाने २२ एप्रिलला प्रत्येक व्यक्तीने एकतरी झाड लावायला पाहिजे. कारण आपण उघड्या डोळ्यांनी करोना महामारीच्या काळात ऑक्सिजनचा तुटवडा पहाला आहे. परंतु नैसर्गिक ऑक्सिजन टिकवून ठेवण्यासाठी जंगल वाचवीले पाहिजे, वृक्षारोपण केले पाहिजे, ज्यांच्या परीसरात जागा नसेल अशांनी एखाद्या कुंडलीमध्ये तरी झाड लावुन "पृथ्वी दीवस" साजरा करायला पाहिजे. त्याचप्रमाणे जंगल तोडीमुळे जंगलातील प्राणी शहराकडे भटकतात त्यांच्यासाठी जगातील संपूर्ण देशांनी जंगलामध्ये छोटे-छोटे तलाव बांधुन जंगली प्राण्यांचे प्राण वाचवुन संगोपन करायला हवे. कारण मानवाच्या अनेक चुकांमुळे अनेक जंगली पशु-पक्षी व महत्त्वपूर्ण औषधीयुक्त वृक्ष लुप्त होत आहे. या पृथ्वीतलावर प्रत्येक प्राण्याचे व वृक्षांचे असणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक पशु-पक्षी एकमेकांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे प्रत्येक वृक्ष महत्वाची भुमिका बजावीत असते. जगातील "गिधाड" हा पक्षी अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावीत असतो. मेलेल्या प्राण्यांचे मांस खाणे "गिधाडांचे" काम असते. त्यामुळे अशुद्ध परीसर शुद्ध होतो. परंतु दुःखाची बाब ही की वायुप्रदूषण व जलप्रदूषण यामुळे गिधाडांची संख्या नाहीच्या बरोबरीत दिसते. त्यामुळे पृथ्वीवर मानवजातीचे असने जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच जंगलातील संपूर्ण पशु-पक्षी-वृक्ष यांचे सुध्दा जिवन तेवढेच महत्त्वाचे आहे. तेव्हाच पृथ्वी सुरक्षीत राहील. मानवजातीने स्वतःच्या स्वाथापीटी "पृथ्वीची राखरांगोळी" केली आहे. पुढे चालुन महाभयानक परीणाम सर्वांनाच भोगावे लागतील. आता अमेरिका-इजरायल-हमास-इराण-हिजबुल्ला-हुती यांचा संघर्ष व रशिया-युक्रेन संघर्ष यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे संकट पृथ्वीवर ओढवल्याचे दिसून येते. आज मानवजातीने पुर्वेपासुन तर पश्चिम पर्यंत उत्तर पासुन तर दक्षिण पर्यंत, आकाश-पाताळा या संपूर्ण ठीकाणी मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे जाळे पसरविले आहे. यामुळे आज "पृथ्वी माता" सुध्दा भयभीत आणि चिंतेत आहे म्हणूनच आज आपल्याला कृत्रिम ऑक्सिजनची गरज भासत आहे. आज मानवाची रक्षा करण्याकरीता पृथ्वीला वाचविण्याचा "संकल्प" जगातील संपूर्ण राष्ट्रांनी घ्यायला पाहिजे. आज वृक्षलागवडच पृथ्वीला वाचवु शकते. कारण आज जगात जंगलांचे संगोपन होत नसल्याने मोठ्या प्रमाणात वनवे लागतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जंगल संपदा नष्ट होत आहे. त्याचप्रमाणे देशात व जगात दिवसेंदिवस आगीच्या सुध्दा घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे वाढते तापमान यामुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे हे नक्की. याला कुठेतरी थांबवायला पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे पावसाचे पाणी जमीनीमध्ये मुरेल व पावसाचे पाणी सरळ समुद्र किंवा नद्यामध्ये न जाता पृथ्वीच्या पोटात जाईल. यामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढण्यास मोठी मदत मिळेल व उष्णतेचे प्रमाण कमी होईल. यामुळे विहीरी, तलाव व नदी-नाले, ओढे नेहमी जलमग्न राहील. आज मानवाने पाण्यासाठी सरळ पाताळात प्रवेश केला आहे. म्हणजेच आज मानवाने पाण्यासाठी जमिच्या आत ७०० फुट खोलवर जाऊन बोरवेलच्या सहाय्याने आपण देवलोकातील (पाताळातील) पाणी शोषीत आहोत. मानवाची जमीनीतील पाण्याची क्षमता फक्त ५० ते ६० फुटांपर्यंत आहे. परंतु मानवाचा अतिरेक हा विध्वंसाकडे किंवा विनाशाकडे न्यायला काहीच वेळ लागणार नाही. कारण मानवाच्या हातात सर्वच काही आहे. परंतु मानवाला अजुन पर्यंत निसर्गावर नियंत्रण ठेवता आले नाही. नैसर्गिक आपदासमोर मानव नेहमी हतबल व अपंग होतांना दिसतो. वनवा लागने, महाप्रलय येणे, हीमकडा कोसळने, उष्णतामान वाढने, भुकंप येणे, सुनामी येणे, ढगफुटी ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण गोष्टी मानवाने स्वतःहुन ओढवलेल्या आहेत. यामुळे जगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात जिवीत हाणी व वित्तीय हानी होतांना आपण पहातो. यामुळे आज संपूर्ण जगाने एकत्र येऊन पृथ्वीला वाचविण्याचा "संकल्प" केला पाहिजे. पृथ्वीला वाचविने म्हणजे "महायुध्द" जिंकण्यासारखेच आहे हे महायुध्द जिंकण्यासाठी जगातून सर्वच स्तरातुन प्रयत्न व्हावयास पाहिजे. आज संपूर्ण जग कठीण घडीतुन प्रवेश करीत आहे. संपुर्ण मानवजातीपुढे तीन प्रश्न उभे ठाकले आहे एक आहे पृथ्वीचे रक्षण, दुसरे म्हणजे वैश्विक महामारी पासुन सुटका आणि तिसरे म्हणजे तिसऱ्या महायुद्धापासुन जगाला वाचविणे याबाबी तेव्हाच शक्य होवू शकते जेव्हा मानवजात खरी मानुसकी दाखवेल. कारण दीवसेंदीवस समुद्राच्या पाण्याची पातळी वाढुन पृथ्वीवरील जमिनीचा भुभाग कमी-कमी होतांना दिसतो. याकरीता ग्रामीण भागातून शहराकडे येणारा लोंढा थांबवीला पाहीजे व सरकारने शेतीला सर्वतोपरी प्रथम प्राधान्य द्यायला पाहिजे. यामुळे पृथ्वीचे रक्षण होईल व खऱ्याअथार्ने "पृथ्वी दिवस"मानल्या जाईल. "पृथ्वी मानवजाती के लिये मेहमान है, मालक नहीं" ही बाब मानवजातीने लक्षात ठेवली पाहिजे व पृथ्वीचे रक्षण केले पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत पृथ्वीवर तिसऱ्या महायुद्धाचे संकट ओढवतांना दिसत आहे. यामुळे पृथ्वीचा विनाश केव्हाही होवू शकतो याला ताबडतोब थांबायला हवे. पृथ्वी दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना आग्रह व विनंती करतो की नैसर्गिक ऑक्सिजन वाढविण्यासाठी जंगल तोड थांबवायला हवी व मोठ्या प्रमाणात वृक्षलागवडीवर भर द्यायला हवा यामुळे "गुरांना चारा व सर्वांना शुद्ध हवा आणि शुद्ध ऑक्सिजन" मिळण्यास मोठी मदत मिळेल व पृथ्वी वाचेल. पृथ्वी सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित हा मुलमंत्र जगातील संपूर्ण देशांनी जपायला हवा. जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# ३.५१ कोटींच्या रस्ते कामावर सवाल; भाजप नगरसेविकेचा एल्गार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुळे सोलापूर परिसरातील डी-मार्ट ते विजापूर हायवे दरम्यान झालेल्या रस्ता डांबरीकरणाच्या कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत भाजपच्या प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेविका श्रद्धा पवार यांनी महापालिका सभागृहाबाहेर चिमुकलीसह उपोषण सुरू केले आहे.



सदर रस्त्याच्या कामासाठी सुमारे ३ कोटी ५१ लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. मात्र हे काम नेमके कोणत्या योजनेतून मंजूर झाले, याबाबत त्यांनी शंका उपस्थित केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी चुकीचे इस्टिमेट तयार करून ठेकेदारास लाभ मिळवून दिल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

श्रद्धा पवार यांनी सांगितले की, जर हे काम राष्ट्रीय धुळमुक्त योजनेतून मंजूर झाले असेल, तर इस्टिमेटमध्ये मोठ्या त्रुटी असतानाही त्यास तांत्रिक मंजुरी कशी देण्यात आली, याची सखोल चौकशी व्हावी. या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, महापौर विनायक कोंडयाल आणि सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी घटनास्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. यावेळी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

# RTE प्रवेशासाठी ९६५ जागा रिक्त; ३० एप्रिलपर्यंत अंतिम संधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांमध्ये मोफत शिक्षण देणाऱ्या RTE योजनेअंतर्गत जिल्ह्यात आतापर्यंत १,७०६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. मात्र अजूनही ९६५ जागा रिक्त असून पात्र विद्यार्थ्यांना ३० एप्रिलपर्यंत प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध आहे.

जिल्ह्यात एकूण २८६ शाळा फळए प्रवेशासाठी पात्र असून २,६७३ जागांवर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यापैकी अद्याप मोठ्या संख्येने जागा रिक्त असल्याने शिक्षण विभागाने पालकांना आवाहन केले आहे की,




त्यांनी विलंब न करता संबंधित शाळांमध्ये जाऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

**तालुकानिहाय रिक्त जागा पुढीलप्रमाणे :**

अक्कलकोट - १६, बार्शी - ५२, करमाळा -४५, माळशिरस - ८८, मंगळवेढा - २५, मोहोळ - ७०, माढा - ९६, पंढरपूर - १९६, सांगोला - १०३, उत्तर सोलापूर - १५८, दक्षिण सोलापूर - २८, सोलापूर शहर- ८८. एकूण रिक्त जागा - ९६५.

दरम्यान, प्रवेशासाठीची मुदत वाढवून ३० एप्रिलपर्यंत करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांच्या पालकांनी ही संधी दवडू नये, असे आवाहन प्राथमिक शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

'आरटीई अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांनी तत्काळ प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. मुदतवाढ दिली असली तरी शेवटच्या क्षणाची वाट पाहू नये,' असे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले.

# वाहनांचे मॅन्युअल योग्यता प्रमाणपत्रासाठी 31 जुलै पर्यंत मुदतवाढ

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** एटीएस' (ऑटोमॅटिक टेस्टिंग स्टेशन) प्रणाली अद्ययावत करण्याच्या प्रक्रियेमुळे वाहनांचे मॅन्युअल योग्यता प्रमाणपत्र नुतणीकरण काही कालावधीसाठी पूर्णतः बंद ठेवण्यात आले होते. यामुळे राज्यातील 11 प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या कार्यक्षेत्रातील सुमारे 15 लाख वाहतूक व्यावसायिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते. सदर अडचणींचा विचार करून, वाहनधारकांना दिलासा देण्यासाठी मॅन्युअल योग्यता प्रमाणपत्र नुतणीकरणाची मुदत दि. 31 जुलै 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांना सूचित करण्यात येते की, ज्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र कालबाह्य झाले आहे त्यांनी तात्काळ प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर येथे ऑनलाईन अपॉईटमेंट घेऊन नुतणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी. वाहनधारकांनी ही मुदतवाढ लक्षात घेऊन विलंब न करता आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selection Board (SSB) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दिनांक 4 मे 2026 ते 13 मे 2026 या कालावधीत ररइ कोर्स क्र. 65 आयोजीत करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

तरी सोलापूर जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदांची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दिनांक 30 एप्रिल 2026 रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईट वर सर्च करुन त्यामधील ररइ-65 कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत घेऊन यावेत.

सदर एस.एस.बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेवून यावेत :-

कंम्बाईड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन (CDSE- UPSC) अथवा नॅशनल डिफेन्स ॲकेडमी एक्झामिनेशन (NDA-UPSC) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे.

एनसीसी C सर्टिफिकेट A किंवा B ग्रेड मध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी.

टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस. एस. बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.

विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नांव असावे.

तसेच अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आयडी : training.pctcnashik@gmail.com व दुरध्वनी क्र. 0253-2451032 किंवा व्हाटसअप क्रं. 9156073306 वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

# वसुंधरा दिनानिमित्त 'वसुंधरा रक्षक अभियान' व 'महा-आरपीईटी' अभियानाचा शुभारंभ

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि वेगाने होणारे शहरीकरण या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने 'वसुंधरा रक्षक' म्हणून पुढे यावे, असे आवाहन राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. 'वसुंधरा रक्षक' ही संकल्पना केवळ उपक्रम नसून ती जनआंदोलन बनवण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे आयोजित समारंभात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते 'वसुंधरा रक्षक अभियान २०२६', 'महा-आरपीईटी' अभियान, राज्य वातावरणीय कृती कक्षाच्या संकेतस्थळाचे अनावरण तसेच 'इमिशन ट्रेडिंग स्कीम' प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी 'वसुंधरा रक्षक' अभियानाच्या लोगोचेही अनावरण करण्यात आले. या लोगोची निर्मिती स्वतः मंत्री पंकजा मुंडे यांनी केली आहे.

यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम आणि विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह कोकाकोला कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी उपस्थित होते.

'वसुंधरा रक्षक' या संकल्पनेला मातृत्वाची जोड देत मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, वसुंधरा म्हणजे केवळ पृथ्वी नव्हे, तर आपली आई आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विकास, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणाबरोबर प्रदूषणही वाढत आहे. त्यामुळे संतुलित विकासाचा मार्ग स्वीकारत पर्यावरण रक्षणासाठी ठोस पावले उचलावी लागतील.

'वसुंधरा रक्षक' अभियानाच्या माध्यमातून राज्यभर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांसारखे 'वसुंधरा वॉरियर्स' तयार केले जाणार आहेत. गावागावांत, वॉर्डावॉर्डात ही चळवळ पोहोचली पाहिजे. हे रक्षक प्रदूषणाविरुद्ध लढतील. प्रत्येक नागरिकाने झाडे लावणे, कचरा वर्गीकरण करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे अशा कृतींमधून आपला वाटा उचलावा, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रदूषणाचा परिणाम प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची तीव्रता जाणवत नाही. लोकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम पाहून बदलाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत असल्याचे सांगून, आजच्या पिढीला पर्यावरणातील बदल समजावून सांगण्यासाठी 'आज-काल-उद्या' या संकल्पनेवर आधारित माहिती आणि डेटा उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी नमूद केले. आजची पिढी तंत्रज्ञानात पुढे असली तरी पर्यावरणाची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. पुढील पिढीला संपत्ती नव्हे, तर स्वच्छ हवा आणि पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे.

'महा-आरपीईटी' अभियानाबाबत मंत्री पंकजा मुंडे यांनी प्लास्टिक कचऱ्याच्या पुनर्वापरावर भर देत 'रिड्यूस, रियूज, रिसायकल आणि रिथिंक' या तत्त्वांचा अवलंब करण्याचे आवाहन केले. अनावश्यक पॅकेजिंग कमी करणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि पुनर्निर्मितीला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून त्यांचा उत्पादकांकडून पुनर्वापर करण्याची संकल्पना पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. राज्यात अशा प्रकारचा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# हद्दवाढ व गुंठेवारी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक १२ मधील नागरिकांच्या मालमत्ता नोंदणी प्रक्रियेला गती देण्यासाठी आयोजित विशेष शिबीर बुधवारी नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूल, निलम नगर, एमआयडीसी येथे उत्साहात पार पडले.

हद्दवाढ, गुंठेवारी मोजणी तसेच नोटरीद्वारे झालेल्या व्यवहारांची अधिकृत नोंदणी करण्यासाठी या शिबिराला सुमारे २००० हून अधिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात नागरिकांनी नोटरी कागदपत्रे, टॅक्स पावत्या, प्रॉपर्टी कार्ड, ७/१२ उतारे, खरेदीखत आणि नकाशे सादर करून आपल्या मालमत्तेची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेतला. तसेच RTSR अर्जांमुळे नोंदणी प्रक्रियेला गती मिळाली. या उपक्रमामुळे स्वतंत्र सातबारा उतारा मिळणे, बांधकाम परवानगी सुलभ होणे आणि बँक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

हा उपक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे, पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे आणि महापौर विनायक कोंडयाल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी महापौरांनी नागरिकांना मार्गदर्शन करताना अशा शिबिरांमुळे वर्षानुवर्षे प्रलंबित प्रश्न सुटणार आहे.

नागरिकांच्या विश्वासाला न्याय देत त्यांच्या स्वप्नातील घराला कायदेशीर आधार देणार असल्याचे सांगितले. नगरसेवक सिद्धेश्वर कमटम व नगरसेविका सौ सारिका सिद्धाराम खजूरगी यांनी शिबिराचे सुयोग्य नियोजन केले. नागरिकांची गैरसोय होऊ नये याची विशेष काळजी घेण्यात आली. नियमित गुंठेवारीमुळे महापालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार असल्याचे महापौरांनी समाधानही यावेळी व्यक्त करण्यात आले.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त स्मृतिवन वनविहार येथे स्वच्छता व वृक्षारोपण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक वसुंधरा दिन निमित्त स्मृतिवन वनविहार येथे स्वच्छता व वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात पार पडला. सोलापूर महानगरपालिका, स्मृति उद्यान, इको फ्रेंडली क्लब, इको नेचर क्लब व वर्ल्ड वाइल्डलाईफ कंझर्वेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत परिसराची स्वच्छता करण्यात आली तसेच मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली. कार्यक्रमास पर्यावरण संवर्धनासाठी ओळखल्या जाणाऱ्या सोलापूरच्या युवा उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर प्रमुख उपस्थिती व कृतिशील सहभाग नोंदवला. याशिवाय सामाजिक वनीकरण विभागाचे विभागीय वन अधिकारी श्री. लक्ष्मण आवारे, सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी शुभांगी जावळे, सचिन दोशी, श्री. कांबळे, संध्याराणी बंडगर, तसेच महानगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक कार्तिक पवार व राजकुमार उबाळे आदी. उपस्थित होते.

यावेळी स्मृतिवन परिसर हा उत्तम पर्यटन व जैवविविधतेचे केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. परिसराचे संवर्धन कसे करता येईल यावर विचारमंथन झाले असून, भविष्यात हे ठिकाण एक आदर्श स्मृति उद्यान म्हणून विकसित होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाचे विशेष कार्यकारी अधिकारी महेश देवकर, विविध संस्थांचे पर्यावरणप्रेमी, इको फ्रेंडली क्लबचे परशुराम कोकणे, डब्ल्यूसीएफचे संतोष धाकपाडे, अजित चौहाण तसेच इको नेचर क्लबचे प्रवर्तक व वसुंधरा अभियानाचे पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, मेघा क्षीरसागर, डॉ. सौ. बोराडे, सौ. पाटील ताई, सचिन कांबळे आदींच्या सहभागाने हा उपक्रम यशस्वी झाला.

यावेळी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला व 'वसुंधरा रक्षणार्थ, स्वच्छ सोलापूर – सुंदर सोलापूर – हरित सोलापूर' अशा घोषणाबाजीद्वारे जनजागृती करण्यात आली. प्रमुख उपस्थिती व पर्यावरण पूरक संस्था व प्रमुख यांचा सामाजिक वनीकरण यांच्याकडून सन्मान हे करण्यात आला

# महिला आरक्षणावर भाजयुमोचे आंदोलन; काँग्रेसचा पलटवार

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरात महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी आज आंदोलन करत काँग्रेस व खासदार प्रणिती शिंदे यांच्यावर टीका केली.

मात्र, या आंदोलनावर काँग्रेसकडून तीव्र पलटवार करण्यात आला असून, महिला आरक्षणाबाबत वास्तवाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. काँग्रेसच्या निवेदनानुसार, महिला आरक्षण विधेयक २०२३ सालीच लोकसभा व राज्यसभेत मंजूर झाले असून, त्याला सर्व विरोधी पक्षांसह खासदार प्रणिती शिंदे यांचा पाठिंबा होता. त्यानंतर राष्ट्रपतींची मंजुरी मिळून १६ एप्रिल २०२६ रोजी केंद्र सरकारने अधिसूचना जारी केली आहे.

त्यामुळे संबंधित कायदा अस्तित्वात असून त्याची अंमलबजावणी प्रलंबित असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले. दरम्यान, अलीकडे संसदेत मांडण्यात आलेले विधेयक हे महिला आरक्षणाशी संबंधित नसून परिसीमन (मतदारसंघ पुनर्रचना) संदर्भातील असल्याचा दावा काँग्रेसने केला.

या विधेयकाच्या माध्यमातून काही राज्यांतील खासदारांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न असल्याचा आरोपही करण्यात आला असून, काँग्रेससह विरोधी पक्षांनी त्यास विरोध केल्याचे नमूद करण्यात आले.

काँग्रेसने पुढे सांगितले की, १६ ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान झालेल्या विशेष अधिवेशनात महिला आरक्षण कायद्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, सरकारकडून अद्याप ठोस निर्णय झालेला नाही. यावेळी सोलापूर शहर काँग्रेस मिडिया सेलचे प्रमुख तिरुपती परकीपंडला यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, भाजपने आंदोलन करताना वस्तुस्थिती जाणून घेणे आवश्यक आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आधीच मंजूर झालेल्या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी दबाव आणणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणामुळे शहरात राजकीय वातावरण तापले असून महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून भाजप व काँग्रेस यांच्यात आरोप–प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे.

# मिरवणुकीसाठी मध्यरात्रीपर्यंत वेळ वाढवण्याची मागणी; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १४ मे रोजी काढण्यात येणाऱ्या भव्य मिरवणुकीसाठी रात्री १२.०० वाजेपर्यंत वेळ मिळावा, या मागणीसाठी आज ठोस पाऊल उचलण्यात आले. पोलीस प्रशासनासोबत झालेल्या चर्चेनंतर मिरवणुकीची वेळ वाढवण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे असल्याचे स्पष्ट झाल्याने, शिवपुत्र धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मध्यवर्ती महामंडळ, सोलापूर यांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन मा. दिनेश पारगे यांना अधिकृत निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे १४ मे रोजी होणाऱ्या मिरवणुकीसाठी मध्यरात्रीपर्यंत परवानगी देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. यावेळी मध्यवर्ती महामंडळाचे संस्थापक राम भैय्या जाधव यांच्यासह संदीप आबा चेळेकर, सुदीप पिंपरे, युवराज पाटील, राहुल जाधव, सागर गायकवाड, शुभम वाघमोडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, मिरवणूक एकजुटीने, शिस्तीत आणि सर्व नियमांचे पालन करून पार पाडण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा सन्मान हा स्वाभिमानाचा विषय असून, मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# सिंहगड पब्लिक स्कूल; गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केगाव येथील सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजने उइरए दहावी बोर्ड परीक्षेत १०० टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी करत शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता पुन्हा अधोरेखित केली आहे. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होत अनेकांनी उच्च टक्केवारीसह विशेष प्रावीण्य मिळवले.

या यशानिमित्त सत्कार समारंभ आयोजित केला होता.

या समारंभात सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ व सिंहगड इन्स्टिट्यूट, केगावचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचा आनंद साजरा केला.

या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. 'आमच्या मुलांच्या यशामागे शाळेचे संस्कार आणि शिक्षकांचे परिश्रम आहेत,' अशी भावना पालकांनी व्यक्त केली.

'ही शाळा केवळ शिक्षण देत नाही, तर विद्यार्थ्यांना घडवते,'असेही त्यांनी सांगितले.

यावेळी कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत, 'हा निकाल केवळ यश नसून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीची भक्कम पायाभरणी आहे,' असे मत व्यक्त केले. समारंभास प्रशालेच्या मुख्याध्यापिका शाहीन शेख, उपमुख्याध्यापक प्रकाश नवले, उपमुख्याध्यापिका निकहत शेख तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, सिंहगड पब्लिक स्कूल पुन्हा एकदा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक ठरले आहे.

# सिईओ जैन यांनी घेतला माळशिरस पंचायत समितीचा आढावा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी आज माळशिरस पंचायत समितीचा ध्वजांकित योजनांचा आढावा घेतला. या प्रसंगी पंचायत समिती येथे जिल्हा नियोजन समिती मधून बसविणेत येत असलेले सोलार प्रकल्पाची पाहणी केली. माळशिरस तालुक्यातील पुरंदावडे येथील आरोग्य केंद्राची पाहणी केली. तसेच जलजीवन मिशन च्या पाण्याच्या टाकीची पाहणी करून योजना पुर्ण करणेचे सुचना दिल्या. तसेच तिरवंडी येथील प्राथमिक शाळेची पाहणी केली. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर , माळशिरस गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे उपस्थित होते.

# 24 ते 26 एप्रिल सहकार भारतीचे नॉर्थकोट मैदानावर महिलांसाठी राज्यस्तरीय व्हिजन एक्स्पो

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- महिलांचे संघटन आणि महिलांचा आर्थिक विकास या हेतुने सोलापूर जिल्हा सहकार भारतीच्या वतीने राज्यस्तरीय व्हिजन एक्स्पो फॉर वुमेन एम्पावरमेंट या संकल्पनेतून महिलांकडून उत्पादित वस्तुचे प्रदर्शन आणि विक्री नॉर्थकोट मैदानावर दि. 24 ते 26 एप्रिल या दरम्यान आयोजन करण्यात आल्याची माहिती या एक्स्पोच्या स्वागताध्यक्षा सुधा अळ्ळीमोरे यांनी दिली.

कला, स्वाद व संस्कृतीचा अनोखा संगम या व्हिजन एक्स्पोच्या माध्यमातून अनुभवायला येणार आहे. महिलांना सक्षम करण्यासाठी एक पाऊल या धर्तीवर या व्हिजन एक्स्पोचे आयोजन करण्यात आले असून महिलांकडून उत्पादित वस्तुला व्यासपीठ मिळावे म्हणून या प्रदर्शनातील स्टॉल मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. या मध्ये



महिलांनी मोठ्यासंख्येने सहभागी व्हावे असे आवाहनही यावेळी स्वागताध्यक्ष सुधा अळ्ळीमोरे यांनी केले.

दि. 24 एप्रिल रोजी या व्हिजन एक्स्पोचे उदघाटन आ.चित्रा वाघ यांच्या हस्ते होणार असून यावेळी महापौर विनायक कोंड्याल, दि. 26 एप्रिल रोजी याचा समारोप पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी 11 ते रात्री 9 या वेळेत हे प्रदर्शन होणार आहे. महिलांसाठी असर्णाया साड्या, ड्रेस, विविध प्रकारचे आभुषणे, पर्स पासून ते सर्वच वस्तु तसेच खाद्य पदार्थ असा या व्हिजन एक्स्पो मध्ये सहभाग असणार आहे. तसेच महिलांसाठी परिसंवादाचेही यामध्ये आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यातील महिलांकडून यामध्ये स्टॉल्स लावण्यात येणार आहे. याचा लाभ सोलापूरकरांनी घ्यावा.

**महिला बालकल्याण मंत्री मेघना बोर्डीकर, चित्रा वाघ यांची उपस्थिती राहणार**

या व्हिजन एक्स्पोला राज्याच्या महिला बाल कल्याण मंत्री मेघना बोर्डीकर तसेच आ.चित्रा वाघ, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, शहाजी पवार, सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश संघटक शरद जाधव यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

परिसंवाद – राज्यातील विविध तज्ञ महिलांचा सहभाग असलेला परिसंवाद यामध्ये होणार आहे.

बिना संस्कार नही सहकार, बिना सहकार नही उद्धार हे ब्रीद घेवून काम करर्णाया सोलापूर जिल्हा सहकार भारतीच्या वतीने महिलांना सक्षम करण्याचा या व्हिजन एक्स्पोच्या माध्यमातून प्रयत्न होणार आहे. नॉर्थकोट मैदानावर जवळपास 100 पेक्षा अधिक स्टॉल्स महिलांना मोफत उपलब्ध होणार आहेत. सहकार भारतीचे विभाग प्रमुख संतोष गायकवाड, कार्यकारणी सदस्य सुर्यकांत पाटील, सोलापूर जिल्हा अध्यक्ष किरण करकमकर, महामंत्री यशवंत बुंहाडे, कार्यक्रम प्रमुख प्राची धामणगांवकर, सुजाता इनामदार,डॉ. जयंत शेळगीकर, अर्चना कुलकर्णी, श्रृती पवार, हनुमंत कोळी, आरती पानगांवकर,कुमुद अंकाराम यांच्यासह सहकार भारतीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते या व्हिजन एक्स्पोच्या यशस्वीतेसाठी काम करीत आहेत.

## स्वाधार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांनी अर्जातील त्रुटींची पूर्तता करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील, शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. सदर योजना https://hmas.mahait.or या पोर्टलद्वारे कार्यान्वित आहे.

सन 2025-26 या शैक्षणिक वर्षात पात्र ठरलेल्या एकूण 1059 विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे. तथापि, सध्या 48 विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी पूर्ततेसाठी परत पाठविण्यात आलेले आहेत. संबंधित विद्यार्थ्यांनी अद्याप अजातील त्रुटी दूर केलेल्या नाहीत.

तरी संबंधित सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी दि. 28 एप्रिल 2026 पर्यंत आपल्या अर्जातील त्रुटींची पूर्तता करून अर्ज पुन्हा सादर करावा. निर्धारित मुदतीत त्रुटी पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ भविष्यात मिळणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. असे आवाहन सहायक आयुक्त समाज कल्याण, सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहिर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा
२५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु – 232

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | | | 2 | | 4 |
| | | 7 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 3 |
| | 1 | | 3 | | | | | 7 |
| | 3 | | 6 | 5 | | 4 | 7 | 9 |
| | | 8 | 7 | | 3 | | 6 | 2 |
| | | | 2 | | | 5 | | 8 |
| 8 | 7 | | | | | | | |
| | 4 | 9 | | 1 | | | 2 | |
| 2 | 5 | | 4 | | | 8 | 9 | |

# अकलूज येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथे वीरशैव लिंगायत समाज्याच्या वतीने जगज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची ८९५ वी जयंती विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवुन मोठ्या उत्साहात साजरी केली.

सकाळी महादेव मंदिरामध्ये बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती राजकुमार गुळवे व सौ.राजश्री गुळवे यांच्या शुभहस्ते करण्यात आली तर बसवेश्वर चौकातील उत्सव मुतीर्चे पूजन महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक विलास क्षीरसागर यांनी पुष्पहार घालून पूजन करण्यात आले.त्यानंतर महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील,अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील,माजी सरपंच पांडुरंगभाऊ देशमुख,अकलूज नगरपरिषदेच्या पहिल्या नगराध्यक्षा सौ.रेश्मताई अडगळे व त्यांचे पती लालासाहेब अडगळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.तसेच माळशिरस तालुक्यातील विविध सामाजिक संघटनेच्या बसवेश्वर महाराज यांना अभिवादन करण्यात आले तर अकलूजच्या उपजिल्हा रुग्णालयात शिव शक्ती संघटनेच्या वतीने रूग्णांना फळे वाटप करण्यात आले.



सायंकाळी मिरवणुक सदुभाऊ चौकात आल्या नंतर मुसळधार पावसाने हजेरी लावली. भर पावसात ही ढोल ताशा पथकातील पुरूष व महिला वर्गांनी ढोल ताशा वाजविण्याच्या आनंदा बरोबर पावसात भिजण्याचा मनमुराद आनंद घेत मिरवणुक पुर्ण केली.

दुपारी चार वाजता रथात आरूढ झालेल्या महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मुर्तीचे पूजन सोमनाथ कथले व सौ.तेजश्री कथले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वेळापूर येथील बृहन्मठ मठाधीपती श्री.ष.ब्र.१०८ सद् गुरू सदाशिव शिवाचार्य महास्वामी, अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, सौ. शितलदेवी मोहिते-पाटील, ह्दयरोग तज्ञ डॉ.एम. के. इनामदार यांनी पुष्पहार घालून दर्शन घेतले.त्यानंतर अकलूज शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली.यामध्ये महात्मा बसवेश्वर ढोल ताशा पथकांनी आपली कला सादर केली.यामध्ये महिला व पुरुषांबरोबर लहान मुले ही सहभागी झाले होते.शिवनिर्णय संघटना लेझीम संघाने लेझीम पारंपरिक खेळ सादर केला, तरूणींनी तलवार बाजी,लाठी काठी खेळाचे प्रत्यक्षिक केले तर या मिरवणुकीत सर्वांचे लक्ष वेधून घेणारे विविध वेशभूषेत सहभागी झालेली लहान मुले होती.यामध्ये जेजुरीचा खंडोबा, सकाळच्या पहारीचा वासुदेव, घोड्यावर आरुढ झालेले महात्म्य बसवेश्वर महाराज खास आकर्षण होत.या मिरवणुकीत विरशैव लिंगायत समाजातील पुरूष व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.महादेव मंदिर येथे येथे या मिरवणुकीचा सांगता झाली व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी वीरशैव लिंगायत समाज संचालक मंडळ व समाज बांधवांनी खूप परिश्रम घेतले.

# महिला आरक्षण विधेयकाच्या अंमलबजावणीवर परिसीमनची अट - खा. प्रणिती शिंदे

**लखनऊ (कटूसत्य वृत्त):-** उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे काँग्रेस कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत लोकसभा खासदार प्रणिती शिंदे यांनी केंद्र सरकारच्या धोरणांवर व नीयतवर तीव्र टीका केली. महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करत म्हटले की, प्रचंड बहुमत असूनही 'रणनीतीचे धुरंधर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोदी-शहा यांची रणनीती अपयशी ठरणे ही गंभीर बाब असून लाजिरवाणी आहे.




यावेळी त्यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला की, ही रणनीती खरंच अपयशी ठरली की ती जाणीवपूर्वक अपयशी केली गेली? सरकारला प्रत्यक्षात महिला आरक्षण लागू करण्याची इच्छा नसल्याची शंका या घडामोडींमुळे अधिक बळावते, असेही त्यांनी नमूद केले.

प्रणिती शिंदे पुढे म्हणाल्या की, संबंधित विधेयक महिलांच्या सक्षमीकरणासाठी नसून महिला आरक्षणाच्या आडून परिसीमन (डिलिमिटेशन) लागू करण्याचा एक पूर्वनियोजित प्रयत्न होता. विरोधकांनी हा डाव वेळेत ओळखून ठाम भूमिका घेत विधेयक फेटाळले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आषाढी यात्रेत पालखी मार्गावरील वारकरी यांना सुविधा देणे साठी दक्ष रहा - सिईओ कुशल जैन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रेत पालखी मार्गावरील वारकरी यांना सुविधा देणे साठी दक्ष रहा. आषाढी यात्रेची तयारी आता पासून सुरू करा. अशा सुचना सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिल्या.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील संत श्री.संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील धर्मपुरी, खुडूस, कारूंडे, सदाशिवनगर, पुरंदावडे, वेळापूर वाखरी, भंडीशेगाव तर संत तुकाराम महाराज पालखी मार्गावरील पिराची कुरोली, महाळुंग, बोरगाव, अकलूज, माळीनगर या पालखी मागार्ची व पालखी तळाची पाहणी आज सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी केली. या दौरात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, पंढरपूर चे गटविकास अधिकारी अमोल जाधव , माळशिरस पंचायत समिती गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे, जिल्हा कक्षातील वैभव आहाळे उप अभियंता बांधकाम, उप अभियंता पाणी पुरवठा, विस्तार अधिकारी, सरपंच, पंचायत अधिकारी उपस्थित होते.



**यंदाची आषाढी यात्रा हायटेक राहणार- सिईओ कुशल जैन..!**

पालखी मार्गावर वारकरी यांना सुविधा देण्यासाठी संवाद यंत्रणा अती जलद राहिल याची दक्षता घेणेत येत आहे. मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्षात गतवर्षी चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी यांचे होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन काळजी घेणेत येत आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग वारकरी यांचे साठी करणेत येणार आहे. वारकरी यांचे सेवेसाठी जिल्हा परिषदेचे कर्मचारी यांचे बरोबरच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांची देखील मदत घेणेत येणार आहे. यात्रपुर्वी यंत्रणेत पडणारा ताण कमी करणेसाठी आता पासून नियोजन व त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी नियोजन करणेत येत आहे.

वाखरी पालखी तळा पासून पाहणी ची सुरूवात करून धर्मपुरी पर्यंत वारकरी यांना देणेत येणारे सुविधांचाही माहिती जाणून घेतली. त्यानंतर संत तुकाराम पालखी मार्गावरील पालखी तळाची पाहणी केली. एका दिवसात दोन पालखी मार्गावरील मुक्कामी व विश्रांतीची ठिकाणावरील पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्ष,रस्ते, शौचालय व स्नानगृह सुविधासाठी ची जागा, पालखी तळाची स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत या बाबत ची माहिती घेऊन त्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना आतापासून सुविधांची तयारी करणेचे सुचना सिईओ जैन यांनी दिल्या.

सिईओ कुशल जैन यांनी पायी फिरून सर्व पालखी मुक्कामाची ठिकाणे व विश्रांती ची ठिकाणांची पाहणी केली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी पालखी मार्गावर वारकरी यांचे साठी निवारा केंद्र, स्वागत कमानी, मुख्यमंत्री वारकरी निवारा कक्षातील सुविधांचाही माहिती दिली. उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी वारकरी यांचे साठी देणेत येणारी मोबाईल टॉयलेट (स्वच्छतागृह सुविधा) स्नानगृह, पालखी तळावरील मुक्कामाची सुविधांची माहिती दिली.

**सिईओ कुशल जैन यांनी घेतले विठ्ठलाचे दर्शन..!**

सोलापूर जिल्हा परिषदेचे सिईओ कुशल जैन यांनी श्री विठ्ठल मंदिरात जाऊन विठ्ठल रूक्मिणी मातेचे दर्शन घेतले. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, गटविकास अधिकारी अमोल जाधव, अधिक्षक शहाजहान शेख उपस्थित होते. या प्रसंगी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे वतीने व्यवस्थापक प्रविण धम यांनी सिईओ कुशल जैन यांचे स्वागत व सत्कार केला.

# २७० परिचारिका संपात; रुग्णालयात सेवांवर ताण

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विविध प्रलंबित मागण्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील परिचारिकांनी मंगळवारी बेमुदत संपात सहभागी होत आंदोलन छेडले. सुमारे २७० परिचारिकांनी या संपात सहभाग घेतला असून रुग्णालयातील सेवांवर त्याचा परिणाम झाल्याचे दिसून आले.



मंगळवारी सकाळी रुग्णालयाच्या बी ब्लॉकसमोर सर्व परिचारिका एकत्र येऊन त्यांनी घोषणाबाजी करत आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनाला लिपिक आणि इतर कर्मचाऱ्यांनीही पाठिंबा दर्शवला. त्यानंतर परिचारिका जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलनात सहभागी झाल्या.

या आंदोलनात जुनी पेन्शन योजना लागू करणे, सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची अधिसूचना तातडीने जारी करणे, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, तसेच कंत्राटी व अंशकालीन कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे अशा विविध मागण्यांचा समावेश आहे. याशिवाय सर्व सरकारी कर्मचारी व निवृत्तिवेतनधारकांना कॅशलेस आरोग्य सेवा देण्यासाठी विमा योजना लागू करावी, पीएफआरडीए कायद्याबाबत निर्णय घ्यावा आणि रिक्त पदे तातडीने भरावीत, अशाही मागण्या करण्यात आल्या.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, सोलापूर शाखेने या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला असला तरी रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी सध्या परिचारिका काळ्या फिती लावून काम करत आहेत. शासनाने दोन दिवसांत मागण्या मान्य न केल्यास २४ एप्रिलपासून बेमुदत संपात सहभागी होण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# २७ एप्रिलपासून खत व कीटकनाशक दुकाने बंद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील रासायनिक खत व कीटकनाशक विक्रेत्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत सोमवार (दि. २७) पासून बेमुदत बंदची घोषणा केली आहे. शासनाकडून वारंवार मागण्या करूनही दुर्लक्ष होत असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे जिल्हा पेस्टीसाईड्स अँड फर्टिलायझर्स डीलर्स असोसिएशनने स्पष्ट केले आहे.

या संदर्भात संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. व्यवसाय करताना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून त्याकडे शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

दरम्यान, जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत द्राक्ष छाटणीचा हंगाम सुरू झाला आहे. अशा वेळी खत व औषध विक्रेत्यांच्या बंदमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन संघटनेने शेतकऱ्यांना २६ एप्रिलपर्यंत आवश्यक खते, औषधे आणि बियाणे खरेदी करून ठेवण्याचे आवाहन केले आहे.

बंद काळात कोणत्याही कंपनीची खते व औषधे दुकानदारांकडून स्वीकारली जाणार नाहीत. तसेच शेतकऱ्यांनी आवश्यक मागणी आगाऊ नोंदवून वस्तू दुकानातून घेऊन जाव्यात, यासाठी दुकानदारांना सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत दुकाने ठळक फलकही लावणार असल्याचे सांगण्यात आले.यावेळी संघटनेचे अध्यक्ष गुंडाप्पा पंचे, सचिव बालाजी चौगुले, तसेच दौलत फलटणकर उपस्थित होते.

# आश्वासनांवरच थांबले निर्णय; कर्मचाऱ्यांचा संताप रस्त्यावर



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कर्मचारी संघटनांनी जोरदार आंदोलन छेडले. शासनाने दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधून घेतले. या आंदोलनात कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विविध विभागांतील अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात फलक घेऊन आंदोलकांनी आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले.

प्रलंबित मागण्यांबाबत शासनाकडून वारंवार आश्वासने देण्यात आली, मात्र प्रत्यक्षात ठोस कार्यवाही झालेली नाही, अशी नाराजी यावेळी व्यक्त करण्यात आली. राज्यातील लाखो कर्मचारी निर्णयाच्या प्रतीक्षेत असून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले.

सरकारने संवेदनशीलता दाखवून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी राजीव साळुंखे, अमृत कोकाटे, शंतनू गायकवाड, अशोक इंदापुरे यांच्यासह विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना जाहीर करण्यात आली होती. मात्र, या योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अधिसूचना व कार्यपद्धती अद्याप जाहीर झालेली नाही. परिणामी, १ मार्च २०२४ पासून योजना लागू न झाल्याने या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे पेन्शन प्रलंबित असून त्यांचे भवितव्य अनिश्चिततेत आहे. तात्पुरते निवृत्ती वेतनही अद्याप मिळाले नसल्याची माहिती देण्यात आली.

# सोलापूर जिल्ह्यात पाणीटंचाईवर मात करण्यासाठी १२ कोटींची योजना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्हा परिषदेने सुमारे १२ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने व्यापक नियोजन सुरू केले आहे. यासोबतच अंगणवाडी, प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या दुरुस्ती कामांनाही गती देण्यात येत असल्याची माहिती जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी दिली.



मंगळवारी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या आढावा बैठकीत पाणीटंचाई परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी बोलताना पवार म्हणाले की, एप्रिल ते जून या कालावधीत संभाव्य टंचाई लक्षात घेऊन १२ कोटी ४ हजार १० रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यात २४६ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात आले असून उत्तर सोलापूर तालुक्यातील रानमसले येथे ३२ हजार लिटर क्षमतेच्या खासगी टँकरद्वारे दररोज दोन फेऱ्यांत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.

बैठकीत पावसाळ्यापूर्वी जिल्ह्यातील अंगणवाडी, आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि शाळांच्या इमारतींची तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ज्या ठिकाणी इमारती अत्यंत जीर्ण किंवा धोकादायक अवस्थेत आहेत, त्या ठिकाणी त्या पाडून नव्याने इमारत उभारण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले.

गुळवंची येथील आरोग्य उपकेंद्र आणि मंद्रूप येथील अंगणवाडी इमारतींच्या स्थितीचा विशेष आढावा घेण्यात आला. संबंधित अधिकारी आणि अभियंत्यांनी समन्वयाने पाहणी करून तातडीने अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. तसेच जिल्ह्यातील विविध शाळांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले.

संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन टँकर मागणीनुसार आराखडा तयार करण्यात आला आहे. अंगणवाडी, आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे व शाळांच्या इमारतींच्या दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागाला देण्यात आल्याचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी सांगितले.

# दहावी CBSE मध्ये एमआयटीचा शंभर टक्के निकाल कायम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (उइरए) दहावी परीक्षेत यंदाही शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मार्च २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेत शाळेतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

या निकालात सिध्दी रावत हिने ९६.४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. रिध्दी रावत हिने ९५.८ टक्के गुणांसह द्वितीय, तर राम मल्ल यांनी ९५.४ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच उदयन शिंदे (९३.६ टक्के) आणि गोविंद आहुजा (९३ टक्के) यांनीही उल्लेखनीय यश मिळवत गुणवंतांच्या यादीत स्थान मिळवले.



विशेष म्हणजे, आयटी विषयात सिध्दी रावत आणि रिध्दी रावत यांनी १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष प्रावीण्य मिळवले. एकूण २० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत शाळेच्या यशात भर घातली असून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा पुन्हा एकदा उमटला आहे.

# अभिजित वाळके यांच्या स्वखर्चातून नातेपुते येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी वाचन कट्टा

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून नातेपुते येथे एका नावीन्यपूर्ण सामाजिक उपक्रमाचा लोकार्पण सोहळा पार पडला. बसस्थानकाच्या शेजारील दुर्लक्षित आणि अस्वच्छ जागेचा कायापालट करून सामाजिक कार्यकर्ते अभिजित वाळके यांनी स्वखचार्तून ज्येष्ठ नागरिक वाचन कट्टा निर्माण केला असुन या वाचन कट्ट्याचे उद्घाटन ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.

नातेपुते बसस्थानकाचा शेजारील भाग गेल्या अनेक दिवसांपासून दुर्लक्षित होता. या ठिकाणी नागरिक कचरा टाकत होते. अभिजित वाळके व त्यांच्या सहकाऱ्यांनी पुढाकार घेऊन या जागेची स्वच्छता करून घेतली. तिथे मुरूम टाकून जागा सुशोभित केली, तसेच ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बाकडांची व्यवस्था करून एक सुंदर वाचन कट्टा उभारला. वयोवृद्ध नागरिकांना सकाळी किंवा संध्याकाळी बसण्यासाठी - हक्काची आणि शांत जागा मिळावी, त्यांच्यामध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, या हेतूने या कट्ट्याची निर्मिती करण्यात आली.याप्रसंगी अभिजीत वाळके, राजाराम काळे, अरुण उराडे, छगन मिसाळ, बबन वनवे, हनुमंत सोरटे, राजेंद्र खरे, अशोक नारायणे, दिलीप धाईजे, सुनील साळवे, युवराज वाघमारे, श्रावण सोरटे, दत्तात्रय सोरटे, नवाज सोरटे, गुलाब नदाफ, देवेंद्र सोरटे, अमृत अडसूळ, किसन काळे, नामदेव पांढरे, दादा साळवे, हरिदास कसपटे, वसंत पवार, पांडुरंग बोराटे यांची उपस्थिती होते.



# श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त महोत्सवाची धूम

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** ग्रामदैवत श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त आयोजित भगवंत महोत्सवाला सोमवारी उत्साहात प्रारंभ झाला. राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आणि सोंगी भारुड स्पर्धेने महोत्सवाची सुरुवात झाली असून माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट, बार्शी नगरपरिषद, कृषी उत्पन्न बाजार समिती, पंचायत समिती आणि श्री भगवंत बहुउद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या महोत्सवात २८ एप्रिलपर्यंत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सोंगी भारुड स्पर्धेत प्रथम पारितोषिक ५१ हजार, द्वितीय ३१ हजार, तृतीय २१ हजार तर उत्तेजनार्थ ११ हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. तसेच सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. महोत्सवाच्या सुरुवातीचे कार्यक्रम यशवंतराव चव्हाण सभागृहात होत असून २१ एप्रिलपासून भगवंत मैदानावर भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.



**नगरपालिकेकडून १५ लाखांचा निधी**

भगवंत महोत्सवासाठी बार्शी नगरपालिकेने १५ लाख रुपयांचा निधी महोत्सव समितीकडे सुपूर्द केला. मुख्याधिकारी तैमूर मुलाणी आणि नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या हस्ते हा निधी देण्यात आला. उद्घाटनप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विजय गरड, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे, भगवंत देवस्थान अध्यक्ष दिलीप बुडुख, महोत्सव समिती अध्यक्ष सुभाष लोढा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.